# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## कायदा विभाग , पिंपरी – ४११०१८

Email- legal@pcmcindia.gov.in    दुरध्वनी क्रमांक ०२०-६७३३३३३३/६७३३११०९

**अतिरिक्त कायदा सल्लागार व कायदा अधिकारी पदे मानधनावर भरणेबाबत**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कायदा विभाग या कार्यालयात खालीलप्रमाणे नमूद पदे करार पध्दतीने मानधनावर भरण्यासाठी अटी व शर्तीनुसार अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | किमान अर्हता/ अनुभव | पदाची संख्या | आरक्षण | दरमहा एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | अतिरिक्त कायदा सल्लागार | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या विधी शाखेचा पदविधर किंवा उच्च परिक्षा उत्तीर्ण व मान्यता प्राप्त विद्यापीठाची कला, कायदा, वाणिज्य शाखेचा पदवीधारकांना प्राधन्य.<br>२. कोणत्याही न्यायालयात वकिली क्षेत्रातील किमान ५ वर्षांचा स्वतंत्रपणे काम केल्याचा अनुभव. | १ | लागू नाही | र.रू. ३५,०००/- |
| २ | कायदा अधिकारी | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेचा पदवीधर आणि विधी शाखेचा पदवीधर.<br>विधी शाखेची उच्च पदवी असलेस प्राधान्य.<br>२.स्थानिक स्वराज्य संस्थे मधील किमान ५ वर्षाचा कामाचा अनुभव. | १ | लागू नाही | र.रू. ३०,०००/- |

इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरापालिका, पिंपरी -४११ ०१८ कायदा विभाग यांचेकडे दिनांक०५./०५/२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वा पर्यंत प्राप्त होतील. याप्रमाणे पोस्टाव्दारे किंवा प्रत्यक्ष सादर करावे. अर्जांचे पाकिटावर "अतिरिक्त कायदा सल्लागार व कायदा अधिकारी" या पदावर करार पध्दतीवर नेमणुक करण्याबाबत असे स्पष्ट लिहावे. अर्जाचा नमुना, अटी व शर्ती याबाबतची सविस्तर माहिति महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

क्रमांक: कास/६/कावि/२१९/२०१९
दिनांक: २७/०५/२०१९

जाहीरात क्रमांक: २९६

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

Scanned by CamScanner

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

कायदा विभाग , पिंपरी – ४११०१८

**अतिरिक्त कायदा सल्लागार व कायदा अधिकारी पदे मानधनावर भरणेबाबत**

अति. कायदा सल्लागार व कायदा अधिकारी या पदावरील नेमणुक हया खालील सर्वसाधारण शर्ती व अटीच्या अधीन राहतील:-

१) करार पध्दतीवर नेमणूकीकरिता सर्व साधारण उमेदवारांसाठी दिनांक ३१/५/२०१९ रोजी उमेदवाराचे वय ४५ वर्षापेक्षा अधिक नसावे.

२) अर्ज करणा-या उमेदवारास न्यायालयातील वकीली क्षेत्रातील किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत व नियमित सेवेचा इतर कोणताही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल. याबाबत अर्जदाराने र.रु.१००/- च्या स्टम्पपेपरवर प्रतिज्ञालेख देण्यात यावा.

४) नियुक्ती प्राधिकारी मा. आयुक्त यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.

५) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

६) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही आजार उद्भवल्यास कार्यालय बांधील राहणार नाही.

७) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तींची राहील.

८) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून आठ दिवसाच्या आत रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

९) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यतत्य निर्माण होईल अशा व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी तसेच त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्री बाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहिल.

१०) मुलाखतीकरिता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलव्दारे पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीवर लघु संदेशाव्दारे कळविण्यात येईल यास्तव अर्जदारांना आपल्या वैयक्तिक माहितीत त्यांचा ई-मेल, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी कायदा विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८ यांचे सुचना फलकावर प्रसिध्द करणेत येईल. तसेच अंतिम निवड झालेल्या अर्जदारांना वैयक्तीक ई-मेलवर कळविण्यात येईल.

उपरोक्त १ ते १० अटी शर्ती मला मान्य आहेत ह्याबाबतचे अर्जदाराने रू.१००/- स्टँम्प पेपरवर बंधपत्र देणे बंधनकारक राहील. सदर नियुक्ती कायदा विभागाकडील न्यायालयीन कामकाजासाठी करण्यात येत असून त्यासाठी पात्र उमेदवार मिळाल्यास काही पदे रिक्त ठेवण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

Scanned by CamScanner

# विहित नमुन्यातील अर्ज

प्रति,
मा.आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

उमेदवाराचे अलीकडील कळातील स्वतःचे छायाचित्र येथे चिकटावे.

अर्ज केलेल्या पदाचे नाव -

१) अर्जदाराचे नाव -
२) कायमचा पत्ता -
३) दूरध्वनी क्रमांक - भ्रमणध्वनीसह(अनिवार्य)
४) ई- मेल(अनिवार्य) -
५) सध्याचा पत्ता -
६) जन्म तारीख-
७) राष्ट्रीयत्व -
८) जात व प्रवर्ग -
९) लिंग(पुरूष/महिला)-
१०) अवगत भाषा -
११) शैक्षणिक माहिती –

| अ.क्र. | पदवी | उत्तीर्ण झालेल्या वर्ष | महाविघालयाचे नाव | विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

१२) इतर शैक्षणिकमाहिती (संगणक , सनद इत्यादी) -

| अ.क्र. | अभ्यासक्रम | वर्ष | संस्थेचे (प्रायोजक नाव) |
|---|---|---|---|
| १ | | | |

१३) अनुभवः-

| अ.क्र. | हुद्दा व वेतन | कार्यालयाचे नाव व पत्ता | कालावधी | कामाचा अनुभव (विस्तृत स्वरूपात) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

१४) सद्यःस्थितीत काम करीत असल्याचा तपशीलः

मला पूर्णपणे माहित आहे की, पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या कायदा विभागाकडील न्यायालयीन कामाकरीता करार पध्दतीने मानधनावरील अतिरिक्त कायदा सल्लागार व कायदा अधिकारी या पदाकरिता उमेदवाराची नियुक्ती करण्यात येणार आहे. सदर पदे ६ महिने कालावधीसाठी आहे. व कामाचे व्याप्ती प्रमाणे कमी / अधिक करण्यात येतील. कामाच्या निकडीनुसार पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या कायदा विभागात माझी काम करणेची तयारी आहे.

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझे माहिती प्रमाणे वर दिलेला तपशील सत्य व अचूक आहे. यामध्ये काही चुकीची माहिती आढळल्यास माझी निवड कोणत्याही क्षणी पुर्व सुचनेशिवाय रद्द होईल व मी शिक्षेस पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणीव आहे.

ठिकाणः
दिंनाकः
सोबत सहपत्रे

अर्जदाराची सहीः

Scanned by CamScanner